## L. A. BILL No. XII OF 2026.

A BILL
FURTHER TO AMEND THE INDIAN PARTNERSHIP ACT, 1932,
IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

## सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२.

### भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.

१९३२ चा ९.

**ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास, अंमलात येईल.

सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ५८ ची सुधारणा.

**२.** भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२, (यात यापुढे, ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केला आहे), महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ५८ मधील ,— १९३२ चा ९.

(१) पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईलः—

"(१) पोट-कलम (१क) च्या तरतुदींना अधीन राहून, ज्या क्षेत्रात पेढीच्या धंद्याची कोणतीही जागा स्थित असेल किंवा करण्याचे योजलेले असेल त्याच्या निबंधकाकडे अधिकृत संकेतस्थळावर,—

(क) पेढीचे नाव, पेढीचा पॅन क्रमांक व ई-मेल पत्ता ;

(ख) पेढीच्या धंद्याचे स्वरूप ;

(ग) पेढीच्या धंद्याची जागा किंवा मुख्य जागा ;

(घ) पेढी जेथे धंदा चालवत असेल अशा अन्य कोणत्याही जागांची नावे ;

(ङ) प्रत्येक भागीदार पेढीमध्ये सामील झाल्याचा दिनांक ;

(च) सर्व भागीदारांची संपूर्ण नावे व कायमचे पत्ते, ईमेल पत्ते आणि भ्रमणध्वनी क्रमांक;

(छ) पेढीचा कालावधी,

हे विहित नमुन्यातील ऑनलाइन निवेदन, विहित ऑनलाइन फी भरून आणि भागीदारी विलेखाची सत्यप्रत देऊन, विहित नमुन्यातील ऑनलाइन अर्ज करून पेढीची नोंदणी करता येईल.

निवेदन सर्व भागीदारांकडून किंवा त्याबाबत विशेषतः प्राधिकृत करण्यात आलेल्या त्यांच्या अभिकर्त्यांकडून डिजिटलरीत्या स्वाक्षरित करण्यात येईल.".

(२) पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :-

"(२) निवेदन डिजिटलरीत्या स्वाक्षरित करणारे भागीदार अधिकृत संकेतस्थळावर माहिती टाकतील, तसेच पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या ऑनलाइन नमुन्यात नोंदविलेले निवेदन सत्यापितही करतील. अर्जदाराकडून आवश्यक सहपत्रे देखील अधिकृत संकेतस्थळावर टाकतील.".

सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ५९ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५९ च्या पोट-कलम (१) मध्ये "नोंदवहीत निवेदनाची" या मजकुरानंतर, "डिजिटल रीतीने" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६७ मध्ये “प्रमाणित केलेली” या मजकुरानंतर, “ऑफलाइन किंवा ऑनलाइन” हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ६७ ची सुधारणा.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ (१९३२ चा ९) याच्या कलम ५८ मध्ये, पेढीच्या नोंदणी प्रक्रियेची, विहित केलेल्या नमुन्यात पेढीच्या निबंधकांना निवेदन सादर करण्याची तरतूद आहे. तथापि, विद्यमान तरतुदीमध्ये भागीदारी पेढीच्या नोंदणीच्या ऑनलाइन प्रक्रियेची तरतूद नाही.

**२.** ही प्रक्रिया सुलभ व्हावी या दृष्टीने, शुल्काचे प्रदान, सर्व भागधारकांचे डिजिटल रीतीने स्वाक्षरित केलेले निवेदन, सर्व कागदपत्रे ऑनलाइन सादर करणे यांसह, भागीदारी पेढीची ऑनलाइन रीतीने नोंदणी करण्यासाठी तरतूद करणे प्रस्तावित आहे. यामुळे भागीदारी पेढीची नोंदणी करत असताना, प्रशासकीय कार्यक्षमता, पारदर्शकता आणि गतिमान संप्रेषण यांमध्ये वाढ होण्यास मदत होईल.

**३.** म्हणून, शासनास, भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याची कलमे ५८, ५९ व ६७ यांमध्ये योग्य त्या सुधारणा करणे इष्ट वाटते.

**४.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा उद्देश आहे.

मुंबई,
दिनांक ९ मार्च २०२६.

**देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.

# सन २०२६ चे वि.स. विधेयक क्रमांक १२- भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६ याचे परिशिष्ट. (भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ यातील उतारे) (सन १९३२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९)

**१. ते ५७.** ** ** **

**५८.** (१) ज्या क्षेत्रात पेढीच्या धंद्याची कोणतीही जागा स्थित असेल किंवा करण्याचे योजलेले असेल त्याच्या निबंधकाकडे,– नोंदणीसाठी अर्ज.

(क) पेढीचे नाव,

(कक) पेढीच्या धंद्याचे स्वरूप,

(ख) पेढीच्या धंद्याची जागा किंवा मुख्य जागा,

(ग) पेढी जेथे धंदा चालवत असेल अशा अन्य कोणत्याही जागांची नावे,

(घ) प्रत्येक भागीदार पेढीमध्ये सामील झाल्याचा दिनांक,

(ङ) भागीदारांची संपूर्ण नावे आणि कायमचे पत्ते, आणि

(च) पेढीचा कालावधी,

हे विहित नमुन्यात निवेदणारे निवेदन विहित फी आणि भागीदारी विलेखाची एक सत्यप्रत यासह डाकेने पाठवून किंवा त्याच्याकडे सुपूर्द करून पोट-कलम (१-क) च्या उपबंधास अधीन राहून पेढीची नोंदणी करून घेता येईल.

निवेदन सर्व भागीदारांकडून किंवा त्याबाबत विशेषत्वे प्राकृतिक करण्यात आलेल्या त्यांच्या अधिकर्त्यांकडून साक्षरित केली जाईल.

(१क) पोट-कलम (१) खालील निवेदन हे, पेढीची रचना झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत, निबंधकाकडे पाठविण्यात किंवा त्याला सुपूर्द करण्यात येईल.

परंतु भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) कायदा, १९८४ याच्या प्रारंभाच्या तारखेस किंवा तत्पूर्वी धंदा करणाऱ्या कोणत्याही पेढीच्या बाबतीत, असे निवेदन हे, अशा तारखेपासून एक वर्षाच्या आत, निबंधकाकडे पाठविण्यात किंवा त्याला सुपूर्द करण्यात येईल.

(२) निवेदन स्वाक्षरित करणारी प्रत्येक व्यक्ती विहित रितीने त्याचे सत्यापनही करील.

(३) व (४) ** ** **

**५९.** (१) जेव्हा कलम ५८ मधील उपबंधाचे रीतसर अनुपालन झाले आहे याबाबत निबंधकाचे समाधान होईल तेव्हा, तो पेढी नोंदणीवही म्हणून संबोधल्या जाणाऱ्या नोंदणीवहीत निवेदनाची नोंद नमूद करील, आणि ते निवेदन दप्तरदाखल करील. अशी नोंद नमूद करण्यात येईल आणि असे निवेदन दप्तरदाखल करण्यात येईल त्या तारखेस, पेढी नोंदणीकृत असल्याचे मानण्यात येईल. नोंदणी.

(२) ** ** **

**५९क-१ ते ६६.** ** ** **

नकला देणे. **६७.** निबंधक कोणत्याही व्यक्तीस अर्जावरून व विहित करण्यात येईल अशा फीचा भरणा झाल्यावर, पेढी-नोंदणीवहीतील कोणत्याही नोंदीची किंवा तिच्या कोणत्याही भागाची स्वदस्तुरानिशी प्रमाणित केलेली नक्कल पुरवील.

**६८. ते ७.** ** ** **

**अनुसूची.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२. ]**

**[भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक. ]**

**[ श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री. **]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.